

जागर स्त्री शक्तीचा हा काव्यसंग्रह आपल्या हाती देताना मला खूप आनंद होत आहे. या आधी ही श्री साई प्रतिष्ठान व विश्वशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या तर्फे प्रकाशित झालेले काव्यसंग्रह 'शब्द मैफील', 'शब्द सरिता', 'ध्यास व्यसनमुक्तीचा' या संग्रहातून विविध जनजागृतीपर कवितांना प्रातिनिधिक काव्यसंग्रहाच्या स्वरूपात प्रकाशित करून नवोदितांना लेखनाची संधी प्राप्त करून दिली आहे.

कवीमधील सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने काव्यसंग्रह प्रकाशन व काव्यस्पर्धा काव्यसंमेलन, काव्य गौरव पुरस्कार यासारखे कार्य हाती घेतले आहे.

जागर स्त्री शक्तीचा यात स्त्रियांविषयीच्या काव्यमय भावना लोकांपुढे ठेवताना मी स्वतःला धन्य समजतो. आजच्या स्त्रीच्या व्यथा, वेदना, तिच्यावरचा होणारा अन्याय, समाजाची दुटप्पी भूमिका, तिच्यातील सुप्त आंतरीक शक्ती, तिच्याकडूनच्या अपेक्षा याबद्दल सर्व कवींनी आपल्या भावना प्रांजळपणे मांडल्या आहेत. स्त्रीला स्वशक्तीची जाणीव होते आहे आणि पुरुषही हळूहळू ते मान्य करतोय. ही जाणीव सुखावह आहे.

यात सहभागी सर्व कवी, कवयित्री यांचे मनस्वी आभार, आपल्या हातून असे कार्य घडत रहावे ही शुभेच्छा..!

तसेच हे पुस्तक प्रकाशित करताना ज्यांचे कळत नकळत सहकार्य लाभले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!

**श्री. संजयभाऊ अरुण चौधरी**

मोबा. ९९६०९९४४४

Principal
Science & Commerce College,
Tal. Tuljapur Dist. Osmanabad

सज्योती पब्लिकेशन, पुणे

# जागर स्त्री शक्तीचा



Principal
Anduri Tal. Tuljapur Dist. Osmanabad

| | | | |
|---|---|---|---|
| २२. | नारीशक्ती | सौ. मनिषा अपसिंगकर | ३९ |
| २३. | कालची आजची | सौ. सीमा भांदर्गे | ४० |
| २४. | एकटी | अजिक्य मांगोलीकर | ४१ |
| २५. | कालची व आजची स्त्री | प्रा. डॉ. रजनी लुंगसे | ४२ |
| २६. | संस्कार भारती | महेंद्र गाडे | ४३ |
| २७. | दाखव जगाला | संतोषकुमार उईके | ४४ |
| २८. | बंदिनी | श्रीमती विजया पाटील | ४५ |
| २९. | नारीशक्ती | सौ. सरला साळुंखे | ४६ |
| ३०. | नारी तू लयभारी | सौ. मेघा पाटील | ४७ |
| ३१. | गगनभरारी | सौ. मालती सेमले | ४८ |
| ३२. | करारी | प्रकाश वानखेडे | ४९ |
| ३३. | नारीशक्ती जगात महान | प्रा. सत्येंद्र राऊत | ५० |
| ३४. | माता भगिनी मुलींनो ऐका | लक्ष्मण पाथरीकर | ५१ |
| ३५. | तूच जननी | सौ. जया नेरे | ५२ |
| ३६. | सावित्रीबाईंचे शौर्य | डॉ. भोजराज लांजेवार | ५३ |
| ३७. | तूच खरी माता | अरुण झगडकर | ५४ |
| ३८. | कालची व आजची महिला | लक्ष्मीकांत कोतकर | ५५ |
| ३९. | नारी | कुणाल पवार | ५६ |
| ४०. | जीवन शक्ती | माधव वाघ-गरुड | ५७ |
| ४१. | स्त्री समानता | प्रा. अनुप नांदगावकर | ५८ |
| ४२. | जागर नारीशक्तीचा | सौ. उज्वला मोतेवार | ५९ |
| ४३. | नारी | सौ. अनुराधा धामोडे | ६० |
| ४४. | बाई | प्रविण पवार | ६१ |
| ४५. | नारी शक्ती | उज्वला कोल्हे | ६२ |
| ४६. | भारतीय स्त्री | धनाजीराव चौधरी | ६३ |
| ४७. | नारीशक्ती | कविता नेहेरे (धुमाळ) | ६४ |




Principal
Jawahar Arts, Science & Commerce College, Anadur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

## नारीशक्ती महान

चला सखींनो आज गाऊया
नारीशक्तीचे गान ।
एकमुखाने सांगू चला गं
नारीशक्ती महान ।।धृ।।

धन्य ती माऊली जिने
स्वराज्याचे स्वप्न पाहिले ।
पराक्रमाचे धडे घेऊनी
शिवबांनी महाराष्ट्रास घडविले ।
थोर त्या मातृशक्ती जिजाऊंचे
गाऊया गुणगान ।।१।।

तो पहा झाशीचा किल्ला
मर्दानी ती राणी ।
मेरी झाँसी कभी न दुंगी
अशी गर्जली वाणी।
नारीशक्तीच्या हुंकाराने
दुमदुमले आसमान ।।२।।

समाजसुधारक सावित्रींनी
सहन केल्या किती यातना ।
स्त्री शिक्षणाचा हक्क देऊनी
शिकविली समतेची भावना ।
धन्य त्या क्रांतीज्योतींना
ज्यांनी स्त्रियांना दिला सन्मान ।।३।।

– श्रीमती दिपमाला सोमनाथ खडके
उस्मानाबाद

## नारीशक्ती जगात महान

नारीशक्ती जगात महान ।
नारीशक्तीचा करू सन्मान ।।
दुर्गा, काली, मैत्रेयी, गार्गी
शूरवीर या रणरागिणी
नारी आता अबला नाही
अन्यायाशी झुंज चालू राही
जगात नारीचा हक्क समान ।।१।।

सरस्वतीरूपी सावित्रीदेवी
विवेकी साहसी अशी ही नारी
नारीशक्ती घेते उंच भरारी
नारीला नका समजू बिचारी
ही तर आहे ज्ञानाची खाण ।।२।।

जाणता राजा शिवबाची जिजाबाई
मर्दानी राणी झांशी लक्ष्मीबाई
अन्यायाविरूद्ध जिंकली लढाई
धन्य ती अहिल्या अन् रमाई
नारीशक्ती विश्वाची शान ।।३।।

स्त्रियांनो आता घालवू नका संधी
तुम्हीच व्हा कल्पना इंदिरा गांधी
स्वत:ला समजू नका साधीसुधी
तुम्हीच शिलेदार कणखर बेदी
इतिहास तुमचा वंदनीय महान ।।४।।

– प्रा. सत्येंद्र राऊत
उस्मानाबाद



## माता भगिनी मुलींनो ऐका

चूल अन् मुलात बंदी होतो
कायिक वाचिक मानसिक
गुलाम आपण झालो होतो
आजपर्यंत सहन केले
महिलांनो जागे होऊ
अन्याय अत्याचार संपवण्या
क्रांतिची मशाल पेटवू
हक्क अधिकार स्वातंत्र्य मिळाले
सदुपयोग घेऊया सर्वांचा
मुक्त होऊन गुलामीतून
उद्धार करू नारीशक्तीचा
शिक्षणाची गंगा दारी आली
जिजाऊ सावित्री प्रतिभा होऊ
क्रांती केली विज्ञानाने
सर्वांगीण विकास करून घेऊ
माता भगिनी मुलींना
आवाहन करतो नारी शक्तिला
शिक्षणरूपी ढाल तलवारीने
घडवू नारीशक्तीला
शिक्षणरूपी ढाल तलवारीने
घडवू नारीशक्तीला

– लक्ष्मण नाईक पाथरीकर.
परभणी

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tq. Tuljapur Dist. Osmanabad